## जिल्हा नियोजन समिती

1998 च्या महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम क्रमांक 24 अन्वये जिल्हा नियोजन समिती, नंदुरबारची स्थापना करण्यात आलेली आहे. नंदुरबार जिल्ह्याची लोकसंख्या वीस लाखापेक्षा कमी असल्याने जिल्हा नियोजन समितीची सदस्य संख्या तीस आहे.

**अ) समितीच्या एकूण सभासदांची व निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या.**

1) एकूण संदस्या संख्या - 30

2) एकूण सदस्यापैकी  निवडून द्यावयाच्या चारपंचमांश सदस्याची संख्या 24

**जिल्हा नियोजन समितीची कार्ये**

अ) जिल्ह्यातील पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या योजना / गरज विचारात घेणे व संपूर्ण जिल्ह्याकरिता विकास येजनेचा मसुदा तयार करणे.

ब) पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना /गरज विचारात घेणे आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करणे.

क) जिल्हा वार्षिक योजनेचा(बिगर आदिवासी योजना / विशेष घटक योजना/ आदिवासी उपयोजना/ आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना)  प्रगतीचा आढावा घेणे आणि संनियंत्रण करणे आणि राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदीचे पुनर्विनियोजन करण्याची सूचना करणे.

ड) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची अध्यक्षामार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे.

इ) संविधानाच्या अनुच्छेद  243 झेड डीच्या खंड (3) च्या तरतुदीचे अनुपालन केले जात असल्याची निश्चिती करणे.

फ) अधिनियमातील तरतुदींतर्गत व स्वतंत्रपणे वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांतर्गत समाविष्ट असलेली कामे करणे.

**जिल्हा वार्षिक योजनेत खालील योजनांचा समावेश आहे.**

1) बिगर आदिवासी योजना
2) विशेष घटक योजना (अनु. जातींसाठी योजना)
3) आदिवासी उपयोजना
4) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी योजना

शासनाकडून प्राप्त झालेला निधी वितरीत करणे व योजनानिहाय खर्चाचे जिल्हा नियोजन समितीमार्फत संनियंत्रण केले जाते.

**जबाबदा-या**

1) जिल्हास्तरावरील विविध कार्यान्वयीन यंत्रणांच्या कामकाजात समन्वय साधणे.
2) जिल्हास्तरावरील विविध कार्यान्वयीन यंत्रणांना वार्षिक योजना / पंचवार्षिक यांजनांचा आराखडा तयार करण्यात मार्गदर्शन करणे.
3) वार्षिक योजने अंतर्गत अंमलबजावणी करण्यात येणा-या योजनांचा वेळोवेळी आढावा घेऊन संनियंत्रण करणे.
4) मागील अनुभव, क्षमता, स्थानिक गरजा व लोकसहभाग लक्षात घेऊन वार्षिक योजनांतर्गत होणा-या खर्चातून जिल्ह्यास पुरेपुर लाभ मिळवून देणे.